महात्मा ज्योतिबा फुले यांना जयंतीनिमित्त अभिवादन

थोर समाज सुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या 197 व्या जयंतीनिमित्त महापालिका मुख्यालयात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात पालिका प्रशासक तथा आयुक्त अजय वैद्य यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळेला पालिका उपायुक्त नयना ससाणे, प्र.उपायुक्त प्रणाली घोंगे, प्र.उपायुक्त अजय येडके, प्र.उपायुक्त रमेश थोरात, शहर अभियंता सुरेश भट , विद्युत अभियंता सुनील पाटील, जनसंपर्क अधिकारी मिलिंद पळसुले डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष,माजी नगरसेवक विकास निकम, कार्याध्यक्ष लक्ष्मण गायकवाड, प्रा. सुमित्र कांबळे, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव समितीचे अन्य सदस्य देखील मोठ्या संख्येने उपस्थित होते यांनी देखील महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन केले. यावेळी पालिका आयुक्त  अजय वैद्य यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या कार्याचा थोडक्यात आढावा उपस्थितांसमोर मांडला. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर खऱ्या अर्थाने महात्मा फुले यांना गुरुस्थानी मानत बाबासाहेब आंबेडकरांनी जी क्रांती केली ती महात्मा फुले यांचे आदर्श डोळ्यासमोर ठेवून. भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीतर्फे दरवर्षी चार दिवस डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात येते. त्याची सुरुवात महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीदिनापासून होत असते म्हणून मुख्यालय आवारातील डॉक्टर भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास तसेच जुन्या मुख्यालयासमोरील डॉ.आंबेडकर यांच्या अर्ध पुतळ्यास देखील पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले